सामना उत्सव रविवार पुरवणी

गुरुजी

शोध

आपली प्रतिक्रिया कळवा

# गणपती बाप्पा मोरया!

**गणेश नामक या ब्रह्मशक्तीच्या अनेक अवतारांपैकी विनायकाचा अवतार झाला, ती माघ शुद्ध चतुर्थी! माघ शुद्ध चतुर्थीच्या गणेश जयंती दिवशी महाराष्ट्राच्या या लाडक्या दैवताची उपासना करत असताना त्याची आंतर्बाह्य ओळख, गणपतीचा भक्त म्हणवणाऱ्या प्रत्येक उपासकाने करून घेणे इष्ट आहे.**

गणांचा अधिपती, आदिदेव आणि मूळ ब्रह्मतत्त्वाचं साक्षात प्रतीक म्हणजे गणपती. आसेतु हिमाचल जिथे जिथे हिंदू संस्कृती आहे त्या त्या सर्व ठिकाणी कोणत्याही शुभ कार्याचा प्रारंभ गणेश स्तवनाने करण्याची पूर्वापार प्रथा आहे.

सृष्टीनिर्मिती सुरू झाल्यावर प्रथम निर्माण झाला तो ॐकारमय नाद. हत्तीचे डोके आणि मानवाचे धड या रूपात पुजल्या जाणाऱ्या चतुर्भुज गणपतीच्या रूपाचं मूळ स्वरूप म्हणजे हा ॐकारमय नाद. प्रकृती आणि पुरुष या द्वैत निर्मितीच्याही आधी, या द्वैताच्या सहाय्याशिवाय ॐकाररूपी गणेशाची निर्मिती झाली, म्हणून त्याला आदिदेव म्हटलं जातं. या नाद ब्रह्मातूनच पुढे सत्व, रज आणि तम या त्रिगुणांनी युक्त अशा सृष्टीची निर्मिती झाली. कुठल्याही कार्याच्या पूर्वी गणेशाचे स्मरण केले जाते, त्या श्रद्धेमागे सृष्टिनिर्मितीच्या प्रारंभी गणेशाचे अस्तित्व होते आणि त्याच्यातूनच पुढे सर्व चराचराची निर्मिती झाली हे कारण आहे. ॐकार म्हणजे 'अ', 'उ' आणि 'म' या तीन मात्रा. या तीन मात्रा अनुक्रमे दीर्घ, मध्यम आणि लघु स्वरूपातील नाद लहरींचे, अर्थात त्रिगुणांचे प्रतिनिधित्व करतात. सर्वात वरती असणारा चंद्रबिंदू म्हणजे या तीनही गुणांच्या पलीकडे असणाऱ्या अव्यक्त, सूक्ष्मातिसूक्ष्म अशा ब्रह्मतत्त्वाचे प्रतीक होय. वैदिक काळामध्ये या ॐकाररूपी वैश्विक शक्तीलाच ब्रह्मणस्पती, इंद्र, गणपती अशा विविध नामांनी संबोधण्यात आले. अशा निर्गुण, निराकार, अव्यक्त स्वरूपातील गणेशाची उपासना करणे सर्वसामान्य भक्ताला सुलभ व्हावे याकरिता नंतरच्या काळात रक्तवर्णीय अशा चतुर्हस्त, लंबोदर गजाननाच्या प्रतिमेची निर्मिती करण्यात आली व त्याकाळी ज्या दैवतांचं प्राबल्य जनमानसात होतं. त्या शंकर-पार्वती म्हणजेच पुरुष-प्रकृतीचं द्वैत त्याच्या जन्मकथेला जोडण्यात आलं ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या प्रारंभीच गणेशाच्या निर्गुण आणि सगुण अशा दोन्ही स्वरूपाची अत्यंत सुरेख सांगड घातली आहे.

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ॥
जय जय स्वयंवेद्या । आत्मरूपा ॥१॥

या पहिल्या ओवीत ॐकाररूपी आत्मस्वरूप गणेशाला वंदन केल्यानंतर पुढे 'लावण्याची ठेव' असं म्हणत गणेशाच्या साकार रूपाचं अत्यंत लडिवाळ वर्णन संत ज्ञानेश्वरांनी केलं आहे. गणेशाचे सगुण प्रतीक आपल्या पूर्वसुरींनी पूर्ण विचारांती निर्माण केलेले असल्यामुळे सर्वथा निर्दोष आहे. या प्रतीकाच्या प्रत्येक गुणविशेषाचे चिंतन केले, तर त्यातील आध्यात्मिक गुह्य जाणता येईल. आजच्या आधुनिक विज्ञानाच्या परिभाषेतही गणेश प्रतिमेच्या वैशिष्ट्यांची उकल करता येऊ शकेल.

गणेशाची प्रतिमा रक्तवर्णीय कल्पिली गेली आहे. योग शास्त्रानुसार मानवाच्या पाठीच्या कण्याच्या तळाशी जे चक्र असते त्याला 'मूलाधार चक्र' असे म्हणतात. आध्यात्मिक प्रगतीची सुरुवात याच चक्राच्या जागृतीने होते. मूलाधार चक्रावर ज्या पेशींचा अंमल असतो अशा मेंदूतील विशिष्ट पेशींना कार्यरत करण्यासाठी लाल रंगावर एकाग्रता करण्याची आवश्यकता असते, असे आता आधुनिक विज्ञानानेही सिद्ध केले आहे. सारांशाने मूलाधारस्थितोऽसि नित्यम' असे जेव्हा आपल्या पूर्वसुरींनी सुचविले तेव्हा रक्तवर्णीय गणेशाची स्थापना, मूलाधार चक्रात करण्यामागचे अध्यात्म आणि विज्ञान या दोन्हीचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता हे निश्चित.

गणपती ही बुद्धीची देवता मानण्यात येते. विद्यार्जन करत असताना योग्य ज्ञान ग्रहण होण्यासाठी गणेशाची आराधना करावी असं जाणकार सांगतात. आधुनिक जीवशास्त्रानुसार कोणत्याही प्राण्याचा मेंदू त्याच्या शरीराच्या प्रमाणात जेवढा मोठा असेल तेवढा तो प्राणी बुद्धिमान समजला जातो. प्राणिमात्रात सर्वाधिक बुद्धिमान समजल्या जाणाऱ्या मानवाच्या मेंदूचं त्यांच्या शरीराच्या वजनाशी असणारं सरासरी प्रमाण सर्वाधिक म्हणजे १:४० इतके आहे. गणेश प्रतिकार देह मानवाचा असला, तरी डोकं मात्र हत्तीचं! म्हणजेच मेंदूचा आकार शरीराच्या तुलनेत कितीतरी मोठा. साहाजिकच बुद्धीची देवता म्हणून हे प्रतीक सर्वोत्तम ठरते. याचप्रमाणे सुपासारखे मोठे कान, बारीक पण तीक्ष्ण नेत्र, भक्तांच्या हितासाठी चार हातांमध्ये धारण केलेले पाश, अंकुश, कमळ आणि निर्भेळ आनंदाचे प्रतीक असणारा मोदक, या प्रत्येक प्रतीक वैशिष्ट्यामागे काही सूचक अर्थ दडला आहे. चौदा विद्यांचा आणि चौसष्ट कलांचा अधिपती असणाऱ्या गणेशाच्या हातात जेव्हा लेखणी दाखवली जाते. तेव्हा श्रेष्ठ अशा व्यास मुनींचा लेखनिक होण्याची नम्रतासुद्धा त्याच्यात आहे हा बोध घेणे भक्तांसाठी सर्वात महत्त्वाचे आहे. चिंतनाने असे बोध घेता घेता, गणेश मूर्तीत अध्यासित झालेले गुण, स्वत:च्या अंतरात उत्पन्न होऊन आत्मरूपी गणेशाचे दर्शन प्रत्येकाला घडावे ही सर्वोच्च मागणी त्या मंगलमूर्तीकडे करूया.

- बापट गुरुजी




Ads by Guruji



Ads by Guruji




